महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६५ वे | दिनांक : २१/०९/२०२६ | वार : सोमवार

## IIT मुंबई आत्महत्या प्रकरण: प्राध्यापकावर जातीय छळाचा आरोप; साहिलच्या वडिलांची FIR



**मुंबई :** आयआयटी मुंबईचा विद्यार्थी साहिल रवींद्र वाकोडे याच्या आत्महत्येप्रकरणी प्राध्यापक सूर्यनारायण डल्ला यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात अनुसूचित जाती/जमाती (SC/ST) कायद्याच्या कलमांनुसार गुन्हा नोंदवला असून, सध्या मुंबई गुन्हे शाखेकडून या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे. साहिलच्या वडिलांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीत प्राध्यापकांवर गंभीर आरोप केले आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून प्राध्यापकांनी आपल्या मुलाचा छळ करत त्याला जातीयवादी अपशब्द वापरले, असा आरोप त्यांनी केला आहे. या तक्रारीत आयआयटी मुंबईचे संचालक श्रीशिष बी. केदारे यांच्यासह अनेक प्राध्यापक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही नावे देण्यात आली असून, संचालकांच्याच सांगण्यावरून साहिलचा छळ झाल्याचा दावा वडिलांनी केला आहे. साहिल (वय 22) हा ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागातील बी.टेकच्या दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी होता. 18 सप्टेंबर रोजी वसतिगृह क्रमांक 4 मधील त्याच्या खोलीत तो मृतावस्थेत आढळला. घटनास्थळी पोलिसांना कोणतीही सुसाईड नोट मिळाली नाही. दुसरीकडे, आयआयटी प्रशासनाने असा दावा केला आहे की, आत्महत्या करण्यापूर्वी साहिल परीक्षेदरम्यान चॅटजीपीटीच्या मदतीने मोबाईलवर उत्तरे शोधताना पकडला गेला होता. त्यानंतर त्याच्यावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई न करता विभागप्रमुख आणि प्रशिक्षकांनी त्याचे समुपदेशन केले. तसेच, त्याच्या शैक्षणिक कारकिर्दीवर कोणताही परिणाम होणार नाही, असे आश्वासनही त्याला देण्यात आले होते. मात्र, दुपारी 4 वाजता वसतिगृहात परतल्यानंतर रात्री उशिरा त्याने गळफास घेत जीवनयात्रा संपवली. साहिलच्या मृत्यूमुळे आयआयटीसारख्या देशातील सर्वोच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आयआयटी मुंबईत गेल्या अवघ्या सात महिन्यांत घडलेली ही तिसरी आत्महत्येची घटना आहे. तसेच, या चालू वर्षात देशभरातील विविध आयआयटी संस्थांमध्ये मिळून तब्बल नऊ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. ग्लोबल आयआयटी माजी विद्यार्थी सहाय्यता गटाच्या (Global IIT Alumni Support Group) अहवालानुसार, गेल्या 20 वर्षांत 160 आयआयटी विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली असून, यातील 43 टक्के घटना केवळ गेल्या पाच वर्षांतील आहेत. 2025 मध्ये सर्वाधिक 16 आत्महत्यांची नोंद झाली होती, तर 2026 मध्ये सप्टेंबरपर्यंत नऊ जणांनी आपला जीव दिला आहे. एका सर्वेक्षणानुसार, दहापैकी सहापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी 'शैक्षणिक तणाव' हेच आत्महत्येचे सर्वात मोठे कारण असल्याचे म्हटले असून, बहुतांश आत्महत्या या परीक्षेच्या काळातच घडत असल्याचे या गटाने स्पष्ट केले आहे. भारतातील अग्रगण्य आणि प्रतिष्ठित शिक्षण संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई' (आयआयटी मुंबई ) मधील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या घटनांमुळे खळबळ उडाली आहे. या प्रकरणामागील सत्य समोर आलेच पाहिजे, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या (मनविसे) शिष्टमंडळाने आयआयटी मुंबईच्या संचालक मंडळाला घेराव घालून जाब विचारला. मागील वर्षभरात रोहित सिन्हा (22), नमन अग्रवाल (21), सोहिल सांगवान (20) आणि विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याचा रहिवासी असलेला साहिल वाकोडे (19) या चार विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. उच्च शिक्षणाचे स्वप्न घेऊन संस्थेत आलेल्या या तरुण विद्यार्थ्यांना टोकाचे पाऊल का उचलावे लागले? या प्रश्नाचे उत्तर अजूनही अस्पष्ट आहे. या गंभीर विषयावर मनविसेच्या शिष्टमंडळाने आयआयटी मुंबईचे संचालक डॉ. सुरेश केदारे, उपसंचालक डॉ. रवींद्र गुड्डी आणि सचिव डॉ. भावे यांची भेट घेऊन उत्तर मागितले. मात्र, प्रशासनाकडून अत्यंत मोघम आणि असमाधानकारक उत्तरे मिळाल्याचा आरोप मनविसेने केला आहे. ही केवळ चार कुटुंबांची शोकांतिका नसून देशातील उच्च शिक्षण व्यवस्थेपुढील गंभीर प्रश्न आहे, असे मत मनविसेने व्यक्त केले. मनविसे अध्यक्ष अमित राज ठाकरे यांच्या सूचनेनुसार या सर्व घटनांचा तथ्याधारित आणि कायदेशीर मार्गाने पाठपुरावा केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण न देता त्यांना सुरक्षित, संवेदनशील आणि मानसिक आधार देणारे वातावरण निर्माण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मनविसे राज्य सरचिटणीस ॲड. संतोष गांगुर्डे यांनी केले. या आंदोलनात आणि शिष्टमंडळात सरचिटणीस संतोष गांगुर्डे, सचिव प्रमोद मांढरे, सचिव नितीन ननावरे, उपाध्यक्ष प्रशांत परुळेकर, उपविभाग अध्यक्ष गोविंद जोईल, शाखा सचिव राहुल कदम, विद्यार्थी संघटक वैभव देवकर, उपशाखाध्यक्ष प्रवीण नाडर आणि आकाश सोनवणे सहभागी झाले होते. मनविसेने सर्व मृत विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी ठामपणे पाठीशी राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## जालना रोडवरील ४ उड्डाणपूल पाडणार; १३५ कोटींचा खर्च वाया जाणार - शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** शेंद्रा ते बजाजनगर (ओॲसिस चौक) असा मराठवाड्यातील सर्वाधिक लांबीचा अखंड उड्डाणपूल उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन कार्यक्रमात केली. त्यावर पालकमंत्री संजय शिरसाट यांनी शनिवारी माहिती दिली की, वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अखंड पूल गरजेचा आहे. याचा डीपीआर तयार झाला असून या कामाचे ४ हजार कोटींचे टेंडर येत्या ३ महिन्यांत निघेल. नवा पूल उभारण्यासाठी जालना रोडवर पुढील ८० ते १०० वर्षांचा विचार करून बांधलेले सुमारे १३५ कोटींचे ४ उड्डाणपूल अवघ्या १० ते १५ वर्षांच्या आतच पाडावे लागणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. जालना रोडवरील कोंडी फोडण्यासाठी १९८५ ते २०१५ या काळात सिडको बसस्थानक, मोंढा नाका, क्रांती चौक आणि महावीर चौक येथे चार उड्डाणपूल उभारण्यात आले होते. ५०० ते १ हजार मीटर लांबीच्या आणि १२ ते १५ मीटर रुंदीच्या या पुलांसाठी तत्कालीन प्रशासनाने सुमारे १३५ कोटी रुपये खर्च केले होते. अखंड उड्डाणपूल गरजेचाच आहे. सध्याचे ४ पूल बांधतानाच पुढील १०० वर्षांचा विचार केला असता तर आता हे पूल पाडण्याची आवश्यकता कदाचित पडली नसती. मात्र, आमच्या क्षेत्रामध्ये बेनिफिट कॉस्ट रेशोचा विचार केला जातो. यामुळे खर्चापेक्षा नागरिकांना किती फायदा होतो हे महत्त्वाचे आहे. अखंड पुलामुळे जालना रोडवरील वरची वाहतूक सुटेल, पण पुलाखालील शहरांतर्गत रस्ते ब्लॉक होतील. - प्रा. डॉ. राजाराम दमगीर, निवृत्त स्थापत्य विभागप्रमुख, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सेव्हन हिल्स येथे उड्डाणपूल बांधण्यात आला होता. कोणताही पूल किमान १०० वर्षांचा विचार करून बांधला जातो. मात्र, अवघ्या १५ वर्षांतच हे पूल 'अपुरे' ठरवून पाडण्याची वेळ आली आहे. ही तत्कालीन प्रशासकीय दूरदृष्टीची दिवाळखोरीच असून आता हे पूल पाडण्यासाठी पुन्हा जनतेचा पैसा आणि वेळ खर्च होणार आहे. यासोबतच आगामी किमान ५ वर्षे संपूर्ण शहराला ट्रॅफिक जामच्या मरणयातना सोसाव्या लागणार आहेत. २०१२ मध्ये तयार झालेल्या जुन्या उड्डाणपुलामुळे शिवरायांचा पुतळा झाकत होता. त्यावर शिवप्रेमींनी प्रचंड नाराजी व्यक्त केली होती. म्हणून नुकतेच कोट्यवधी रुपये खर्चून चौथऱ्याची उंची वाढवत महाराजांचा भव्य पुतळा बसवण्यात आला. विशेष म्हणजे पुतळ्याच्या दोन्ही बाजूंनी उड्डाणपूल तयार करण्यात आला होता. आता जुना पूल पाडून त्याच्या जागी अधिक उंच, रुंद आणि अखंड असा नवा उड्डाणपूल आल्यास महाराजांचा पुतळा पुन्हा या नव्या पुलाखाली जाणार का? डीपीआर बनवताना या अत्यंत संवेदनशील आणि भावनिक मुद्द्याचा विचार करून आताच्यासारखाच उड्डाणपूल दोन्ही बाजूंनी करणार का, हा मोठा प्रश्न असणार आहे. शेंद्रापासून वाळूजपर्यंत असलेला जालना रोड हा शहराचा मुख्य कणा आहे. सध्या या मार्गावरून दररोज २.५ ते ३ लाख वाहने धावतात. यात सर्वाधिक ६०% दुचाकी, २०% कार, १०% रिक्षा आणि १०% अवजड वाहनांचा समावेश आहे. पीक अवर्समध्ये दर तासाला हजारो वाहने येथून ये-जा करतात. जुने पूल पाडणे आणि ४ हजार कोटींचा अखंड पूल उभारणे या प्रक्रियेला किमान ३ ते ५ वर्षे लागतील. या काळात जालना रोडवरील प्रचंड वाहतूक पर्यायी मार्गावर वळवताना शहराचा श्वास कोंडणार आहे. अगोदरच अरुंद असलेले शहरांतर्गत रस्ते या ट्रॅफिकचा ताण कसा सहन करणार, हा प्रश्न असल्याचे वाहतूक शाखेच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ सप्टेंबर २०२६


## श्री. विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्याची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** आज मुरूम येथील श्री विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्याची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.सभेच्या प्रारंभी देशाचे माजी गृहमंत्री स्व. शिवराज पाटील चाकूरकर साहेब व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.कारखान्याचे चेअरमन तथा सभेचे अध्यक्ष आमदार बसवराज पाटील यांनी सभेला संबोधित करताना कारखान्याच्या आगामी गळीत हंगामाबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. यावर्षी कारखाना कार्यक्षेत्रात पावसाचे प्रमाण अत्यल्प असून, आजतागायत १८ हजार २६९ हेक्टर ऊसाची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये किमान ३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्यादृष्टीने कारखान्याची परिपूर्ण तयारी करण्यात आली आहे. कार्यक्षेत्रातील संपूर्ण ऊसाचे गाळप करण्यासाठी कारखाना कटिबद्ध असून, गळीत हंगाम २०२६-२७ चा बॉयलर प्रदीपन व गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रम लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगितले.दरम्यान, सभेत विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात मंजुरी दिली. विषय पत्रिकेचे वाचन प्रभारी कार्यकारी संचालक श्री. एस. आर. गवसाणे यांनी केले.यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्री. सादिकमियाँ काझी, धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा मुरूमचे नगराध्यक्ष श्री. बापुराव पाटील, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन श्री. शरण पाटील, कारखान्याचे संचालक श्री. केशवराव पवार, श्री. दिलीप भालेराव, श्री. संगमेश्वर घाळे, श्री. शरणप्पा पत्रिके, श्री. राजीव हेबळे, श्री. दत्तू भालेराव, ॲड. श्री. संजय बिराजदार, श्रीमती मंगलताई गरड, सौ. इरम्माताई स्वामी, सौ. रोहिणीताई पाटील, श्री. संतराम बिराजदार, श्री. शिवलिंग माळी, ॲड. श्री. विरसंगप्पा आळंगे तसेच श्री. प्रकाश आष्टे, श्री. विजयकुमार सोनवणे, प्रा. शौकत पटेल,माजी प्राचार्य श्री. दिलीप गरूड, श्री. भरत मारेकर, श्री. रुफिक तांबोळी, श्री. मल्लीनाथ दंडगे, श्री. दत्तात्रय पाटील, प्राचार्य. श्री. श्रीराम पेठकर, प्राचार्य. सी. टी. बिराजदार, श्री. बुद्धीवंत साखरे, श्री. मदन पाटील, श्री. प्रदीप दिंडेगावे, श्री. दीपक मुळे, श्री. सिद्धाराम कवठे, श्री. प्रतापराव पाटील आदी मान्यवरांसह कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संचालक श्री. विठ्ठलराव बदोले यांनी केले, तर सूत्रसंचालन श्री. राजू पाटील यांनी केले.

## NH-48 वर भीषण अपघात; जांभाळयाच्या २२ वर्षीय तरूणाचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी





**दौलताबाद (जावेद अहमद) :** राजस्थानातील बिजयनगर-अजमेर परिसरातील NH-48 महामार्गावर शनिवार, १९ सप्टेंबर रोजी सकाळी एक भीषण अपघात झाला. एका अज्ञात वाहनाने कारला जोरदार धडक दिल्याने कारचा पार चक्काचूर झाला. या दुर्दैवी अपघातात जांभाळा (ता. गंगापूर) येथील पियुष रोहिदास दाणे (वय २२) या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर इतर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.कंपनीच्या कामानिमित्त जात असताना अपघातमिळालेल्या माहितीनुसार, 'आश्मी रोड कॅरिअर्स प्रा. लि.' (समृद्धी महामार्ग, नागपूर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ - MSRDC) या कंपनीच्या कामानिमित्त हे सर्व जण एमएच-२० एफपी-०५८६ क्रमांकाच्या कारने प्रवास करत होते. कारमध्ये मॅनेजर संजय लाडगे (वय ३९), प्रशांत बनकर (वय १८, जांभाळा), अजय आहेर (वय २४, टाकळी), आदित्य चंदेल (वय २३, टाकळी), जसपित भल्ला (वय ४०, छत्रपती संभाजीनगर) आणि बाळा जगताप (वय ४१) हे सर्व जण सवार होते. विजयनगर-अजमेर परिसरात आल्यावर त्यांच्या कारला अज्ञात वाहनाने भीषण धडक दिली.रुग्णालयात घेतला अखेरचा श्वासधडक इतकी भीषण होती की कारचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांच्या मदतीने सर्व जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, दुर्दैवाने उपचार सुरू असतानाच पियुष दाणे याची प्राणज्योत मालवली. या अपघातात अन्य दोघे जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.कुटुंबाचा मुख्य आधार हरपलापियुष हा समृद्धी महामार्गावरील टोलनाक्यावर कार्यरत होता. तो आपल्या कुटुंबाचा प्रमुख आर्थिक आधार होता. पियुषचे वडील रोहिदास दाणे यांच्या पायाचे नुकतेच एक ऑपरेशन झाले असून ते सध्या आजारी आहेत. अशा कठीण परिस्थितीत तरुण आणि कर्त्या मुलाचा अचानक मृत्यू झाल्याने दाणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पियुषच्या पश्चात आई, वडील आणि दोन भाऊ असा परिवार आहे.जांभाळा गावात अंत्यसंस्कार; परिसरात शोककळापियुष दाणे याच्या निधनाची बातमी जांभाळा गावात पोहोचताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली. रविवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता जांभाळा येथे त्याच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. एका तरुण आणि उमद्या मुलाच्या अशा अचानक जाण्याने संपूर्ण गंगापूर तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## जिंतूर पासून जवळच असलेल्या औढारोड येथील जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा; १३ लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर)** जिंतूर येथून जवळच असलेल्या औढारोड येथीलपत्र्याच्या शेडमधील क्लबमध्ये विनापरवाना 'पफ्लू' नावाचा पत्त्यांचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर नांदेड परिक्षेत्राच्या पोलिस पथकाने छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम, विविध कंपन्यांचे मोबाईल आणि दुचाकी वाहने असा एकूण १३ लाख ८७ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात दखलपात्र गुन्हा क्रमांक ५५०/२०२६, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमातील कलम ४, ५ व १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस नोंदीनुसार, जुगार खेळविण्याच्या आरोपावरून प्रवीण बबनराव चव्हाण, गजानन गंगाधर चुनडे, संतोष गणपतराव राठोड, शंकर गोपीचंद राठोड, गजानन शंकर पालवी, जीवन परसराम राठोड, भारत सुभाष दळवी, बालाजी रामदास, बबन प्रल्हाद राठोड, राजू हरीचंद्र राठोड, भाऊ वरजन आळे, गुलाब लक्ष्मणराव कदम, रमेश विश्वनाथ आठे, राहुल विनायक चव्हाण, रामराव प्रभु जाधव, मनोज दामोधर वरणकर, गणेश कणीराम राठोड, गणपत पाडूरंग राठोड, जनार्दन भागोजी राठोड, गजानन सठयाजी कोकाटे, प्रकाश गुलाब जाधव आणि नागनाथ माधव संगेकर यांची नावे नोंदविण्यात आली आहेत. कारवाईदरम्यान विविध व्यक्तींच्या ताब्यातून रोख रकमेसह लावा, विवो, रिअलमी, सॅमसंग, ओप्पो आदी कंपन्यांचे मोबाईल जप्त करण्यात आले. काही मोबाईलची नोंद ५ हजार ते ४५ हजार रुपये अशा किमतीने करण्यात आली आहे.व्यवस्थापक रमेश्वर भुक्कर यांच्या ताब्यातून १ लाख १२ हजार ४१० रुपये रोख तसेच विवो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. यामध्ये विविध मूल्यांच्या चलनी नोटांचा समावेश असल्याचे पोलिस नोंदीत नमूद आहे.तसेच घटनास्थळावरून होंडा शाइन, युनिकॉर्न आणि स्प्लेंडर या दुचाकी जप्त करण्यात आल्या. त्यामध्ये एमएच २२ एएस ४५९६, एमएच २२ बीएफ ७८४३, एमएच २२ बीजे ३६०५, एमएच २२ बीए ३६१९ आणि एमएच २२ एव्हाय २३७७ या क्रमांकांच्या वाहनांचा समावेश आहे.पोलिसांच्या नोंदीनुसार, रोख रक्कम, मोबाईल फोन व वाहनांसह एकूण १३ लाख ८७ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही कारवाई नांदेड परिक्षेत्राच्या पोलिस पथकाने केली. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रत्ने यांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक इंगोले पुढील तपास करीत आहेत. गुन्हा दाखल करण्याची वेळ रात्री १ वाजून ३७ मिनिटे अशी नोंद आहे.पोलिसांच्या या कारवाईमुळे जिंतूर शहरातील अवैध जुगाराच्या प्रकारांवर कारवाईचा धडाका सुरू असल्याचे दिसून येत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ सप्टेंबर २०२६


## सिल्लोड-सोयगावसह राज्यात 'कोरडा दुष्काळ' जाहीर करा: विजय म्हस्के पाटील यांची मागणी



**सिल्लोड :** पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे सोयाबीन,कापूस व मका पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने सिल्लोड-सोयगाव तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात 'कोरडा दुष्काळ' जाहीर करावा,अशी जोरदार मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.गावात युद्धपातळीवर पारदर्शक पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना तातडीने पीक नुकसानभरपाई द्यावी,तसेच शेतकऱ्यांचे वीज बिल माफ,शैक्षणिक शुल्क माफ व पीक कर्जाचे पुनर्गठन करावे,अशा मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आले आहे.

## मराठवाडा मुक्ती संग्रामात महिलांचा त्याग लाखमोलाचा - डॉ. नानासाहेब लावंड




**करमाड :** राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथील समाजशास्त्र विभागाच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. लावंड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे होते. संस्थेच्या सहसचिव श्रीमती रोहिणी जोशी, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. लक्ष्मीकांत दांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. लावंड म्हणाले की, भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र मराठवाडा निजामाच्या राजवटीत असल्याने तब्बल १३ महिन्यांनंतर १७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्त झाला. वास्तविक १९३८ ते १९४८ या दहा वर्षांच्या कालखंडात या मुक्तिसंग्रामाची पायाभरणी झाली होती. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनाला व्यापक दिशा मिळाली. त्यानंतर गोविंदभाई श्रॉफ, रमणभाई पारिख, विजयेंद्र काबरा, गोविंद पानसरे, जनार्दनमामा यांसह अनेक कार्यकर्त्यांनी लढा पुढे नेला.या संघर्षात महिलांचे योगदान विशेष अधोरेखित करताना त्यांनी दगडाबाई शेळके यांच्या त्यागाचा दाखला दिला. मुक्तिसंग्रामात सक्रिय सहभाग घेण्यासाठी त्यांनी आपल्या वैयक्तिक संसाराचा त्याग केला. पतीचे दुसऱ्या महिलेशी लग्न लावून देण्याचा निर्णय घेऊन त्या आंदोलनात सहभागी झाल्या. त्यांचा हा त्याग तत्कालीन महिला नेतृत्वाची संघर्षनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा अधोरेखित करणारा आहे, असे डॉ. लावंड यांनी सांगितले.सरदार वल्लभभाई पटेल यांनीही मराठवाड्याच्या मुक्तीसाठी ठाम भूमिका घेतली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय नेतृत्वाला दिलेला सल्ला आणि दलित समाजाला केलेले आवाहन हेही या संघर्षातील महत्त्वाचे ऐतिहासिक संदर्भ आहेत. मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ काही नेत्यांचा संघर्ष नसून सामान्य जनता, विद्यार्थी आणि विविध सामाजिक घटकांच्या सहभागातून उभा राहिलेला व्यापक लढा होता, असे त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांनी लोक चळवळ आणि विद्यार्थी चळवळीच्या सक्रिय सहभागामुळे मराठवाडा मुक्ती संग्रामाला व्यापक बळ मिळाले आणि अखेर या लढ्याला यश प्राप्त झाले, असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. लक्ष्मीकांत दांडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश बांगर यांनी केले, तर आभार प्रा. तन्मय भावसार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. कालिदास फड,डॉ. जयश्री पाटील, प्रा. मनोज देवकर, प्रा. योगेश शिंदे, डॉ. ललित गोल्डे , प्रा. प्रशांत माटे, डॉ. इम्रान पठाण, डॉ. लक्ष्मण खरात, डॉ. किशोर काळे तसेच शिक्षकेतर कर्मचारी रमेश जाधव, कैलास जाधव, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## दोन लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** माहेरहून घराच्या बांधकामासाठी दोन लाख रुपये आणावेत, या मागणीवरून विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देणे, मारहाण करणे तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारीवरून पतीसह सासू, सासरे व नणंद अशा चौघांविरुद्ध जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी जया नितीन इंगोले (वय २५, व्यवसाय गृहिणी) यांनी फिर्याद दिली आहे. त्या सध्या जुनुनवाडी, ता. जिंतूर येथे माहेरी राहत असल्याचे पोलिस नोंदीत नमूद आहे. या प्रकरणात पती नितीन गजानन इंगोले, सासू कलावती गजानन इंगोले, सासरे गजानन नामदेव इंगोले आणि नणंद आश्विनी गजानन इंगोले, सर्व रा. इंदिरानगर, कल्याण रोड, डोंबिवली पूर्व, ता. कल्याण, जि. ठाणे, यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.फिर्यादीनुसार, २४ फेब्रुवारी २०२४ ते २८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत डोंबिवली येथील सासरी तसेच जिंतूर तालुक्यातील माहेरी संबंधित प्रकार घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. पतीने ‘तू मला पसंत नाहीस, तुझ्यासोबत संसार करायचा नाही’ असे म्हणत शिवीगाळ करून थापड-बुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.तसेच आरोपी सासू कलावती गजानन इंगोले, सासरे गजानन नामदेव इंगोले आणि नणंद आश्विनी गजानन इंगोले यांनी घराच्या बांधकामासाठी फिर्यादीच्या आईकडून दोन लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी करून शारीरिक व मानसिक त्रास दिला आणि उपाशीपोटी ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे. पैसे आणले नाहीत तर जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीने पोलिसांना सांगितले आहे.या प्रकरणातील गुन्हा मूळतः *डोंबिवली पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दाखल झाल्याचे नमूद असून, तेथून स्थानांतरित करण्यात आलेले गुन्हा क्रमांक ५८२६ जिंतूर पोलीस ठाण्यास प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाने पुढील गुन्हा नोंदविण्यात आला.या प्रकरणी दखलपात्र *गुन्हा क्रमांक ५४४/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहितेतील कलम ८५, ११५(२), ३५१(२), ३५२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे . गुन्हा दाखल करण्याची नोंद १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ३.४५ वाजता करण्यात आली आहे.गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सपोउपनि राणे यांनी केली असून, पुढील तपास पोहेकॉ. शिराळकर करीत आहेत. प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ सप्टेंबर २०२६


## संत निरंकारी मंडळाकडून मुरुम येथील जि. प. कन्या शाळेत स्वच्छता मोहीम




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन (दिल्ली) मुरुम शाखा आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संयुक्त विद्यमानाने, 'स्वच्छता पंधरवडा २०२६' मोहिमेअंतर्गत मुरुम येथील पीएमश्री जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळेत रविवारी (ता. २०) रोजी परिसर स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली.या मोहिमेमध्ये शाळा आणि संत निरंकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व सेवादलाने सक्रिय सहभाग घेतला. शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ता बोराळे, संत निरंकारी मंडळाचे मुरुम ब्रँचचे मुखी दयानंद साखरे, कल्लेश्वर पांचाळ, रमेश मिणीयार, हनुमंत पोतदार, हणमंत मंडले, सुरेश मंडले यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले. स्वच्छता सेवादल इन्चार्ज बिरू बंदीछोडे, दत्ता बोडरे, शिवानंद बिराजदार, प्रमोद नारायणकर, विष्णू पवार, बसवराज बिराजदार, राम भोकले, दयानंद व्हनाळे, प्रसाद सुपेकर तसेच सेवादल भगिनी अनुसया नारायणकर, गुरुदेव बोडरे, मनश्री मोटे, श्रद्धा साखरे आणि शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रमदान करत शाळेचा बाहेरील परिसर, घनकचरा व गवत काढून स्वच्छता केली. झाडांना आळे करून पाणी घालण्यात आले. दुसरीकडे, उषा साखरे, कमल शेवाळे, मीरा मोटे, सुनिता व्हटकर, अश्विनी पांचाळ, भारत बेगमपुरे, बालिका बनसोडे यांनी स्वच्छता फलकांच्या माध्यमातून जनजागृती करून स्वच्छतेचा संदेश दिला. चौकट : मुख्याध्यापक सुभाष राठोड म्हणाले की, संत निरंकारी मंडळाचे कोणतेही सामाजिक उपक्रम ही केवळ एक मोहीम नसून, समाजसेवेचे आणि नैतिकतेचे एक उत्तम उदाहरणच आहे. चौकट : मुखी दयानंद साखरे म्हणाले की, माणसाला आतून व बाहेरून मानसिक आणि आत्मिक समाधान देणारा हा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी आणि परिसर स्वच्छ राहावा, हा यामागचा मुख्य उद्देश असून याद्वारे पर्यावरण रक्षण व सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होत आहे.या अभियानाचे प्रास्ताविकपर मनोगत प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक विजय कोळी तर आभार एम. एम. आकडे यांनी केले. या उपक्रमास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेल्वे पुलाजवळ अनोळखी इसम जखमी अवस्थेत आढळला,दवाखान्यात उपचारा नंतर मयत झाला

**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबाद रेल्वे स्थानक परिसरातील रेल्वे पुलाजवळ सुमारे ३५ वर्षीय अनोळखी इसम जखमी अवस्थेत आढळून आल्याची घटना मंगळवारी (दि. १५) सायंकाळी उघडकीस आली. याप्रकरणी दौलताबाद पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दौलताबाद पोलिस ठाण्याचे कर्मचारी पेट्रोलिंग करीत असताना सायंकाळी सुमारे ७ वाजता रेल्वे पोल क्रमांक ९९/२/३, फत्तियाबाद परिसरातील रेल्वे पुलावर एक इसम जखमी अवस्थेत पडलेला असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता संबंधित इसम गंभीर अवस्थेत आढळून आला.या इसमाचे वय अंदाजे ३५ वर्षे असून, त्याची ओळख पटलेली नाही. त्याला तातडीने शासकीय वाहनातून उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासून त्याला मयत घोषित केले आहे.अनोळखी इसमाचे वर्णन : उंची अंदाजे ५ फूट ६ इंच, रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे व दाढी वाढलेली, अंगात निळ्या रंगाचा चौकटीचा शर्ट, बांधा मध्यम. डाव्या हातावर इंग्रजीत 'J' तसेच मराठीत 'ललिता' असे गोंदवलेले असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.सदर इसमाबाबत कोणाला माहिती असल्यास दौलताबाद पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## देवगिरी गडावर गणेशोत्सवाचा उत्साह; ३५० पायऱ्या चढून भाविकांची दर्शनासाठी गर्दी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** किल्ल्याचे रक्षण करणारे संकटविनायक! देवगिरी गडावर गणेशोत्सवाचा मोठा उत्साह; ३५० पायऱ्या चढून भाविक दर्शनाला सज्जऐतिहासिक आणि पौराणिक वारसा लाभलेल्या देवगिरी किल्ल्यावरील संकटविनायक गणपती मंदिरामध्ये सध्या गणेशोत्सव अत्यंत उत्साहात साजरा केला जात आहे. हे देवस्थान अत्यंत जागृत मानले जात असून, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्थानिक ग्रामस्थ आणि परिसरातील भाविकांची गडावर दर्शनासाठी मोठी गर्दी होत आहे. देवगिरी किल्ल्याच्या मध्यभागी ३५० पायऱ्या चढून गेल्यावर हे सुंदर गणेश मंदिर स्थित आहे. इतिहासकार आणि उपलब्ध नोंदींनुसार, इसवी सन १७६० मध्ये मराठ्यांनी हा किल्ला जिंकल्यानंतर पेशवे नानासाहेब यांनी या मंदिराचे बांधकाम आणि जीर्णोद्धार केला होता. मात्र, काही स्थानिक जाणकारांच्या मते, या मूर्तीचे आणि स्थानाचे अस्तित्व किल्ला पूर्ण विकसित होण्यापूर्वीपासूनचे म्हणजेच अत्यंत प्राचीन काळातील आहे. जुन्या काळात किल्ल्याचे रक्षण करणारे सैनिक आणि पहारेकरी या संकटविनायकाला आपला दैवी आधार मानत असत. गडावर चढाई करताना येणारी संकटे दूर व्हावीत, म्हणून सैनिक येथे नतमस्तक होऊनच पुढे जात असत.१० दिवसांचा सोहळा आणि भक्तांची मांदियाळी दरवर्षीप्रमाणे यंदाही स्थानिक देवगिरीचे ग्रामस्थ आणि परिसरातील भाविक मोठ्या उत्साहाने हा १० दिवसांचा गणेशोत्सव सोहळा साजरा करत आहेत. दौलताबाद, अब्दीमंडी, आणि माळीवाडा या परिसरातील गणेशभक्त दररोज सकाळी मोठ्या संख्येने ३५० पायऱ्यांची चढण पार करून मंदिरात आरतीसाठी हजेरी लावत आहेत.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002